आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

६ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड
- मुंबईत चेंबूर इथं आग दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू, मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर
- मराठी चित्रपटसृष्टीतल्या पहिल्या बाल अभिनेत्री वासंती घोरपडे-पटेल यांचं निधन

  **आणि**
- महिला टी- ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय

**<><><><><>**

नवी दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोक साहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाली आहे. महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाल्याचं घोषीत करण्यात आलं.

हा लोकसंस्कृती आणि स्त्री विचारांचा आविष्कार,आणि त्याअनुषंगानं चळवळ करणाऱ्या सर्वांचा हा सन्मान आहे, अशी भावना तारा भवाळकर यांनी व्यक्त केली.....

**होल्ड - बाईट--तारा भवाळकर**

१९३९ मध्ये पुण्यात जन्मलेल्या तारा भवाळकर यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य लोकसाहित्याचं अध्ययन, चिंतन, संशोधन आणि लेखनासाठी समर्पित केलं. आजवर त्यांचे ३६ पेक्षा अधिक ग्रंथ प्रकाशित झाले असून ३२ पेक्षा अधिक पुरस्कारांनी

त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि साहित्य, नाट्यपरंपरा अशा विविध विषयांत त्यांनी मोलाची भर घातली आहे. ललित लेखन, अनुवाद, व्याख्यानं, आकाशवाणीसाठी लेखन, यासह मराठी विश्वकोश, समाजविज्ञान कोश, मराठी वाङ्मयकोश, आणि ग्रंथकोश यातल्या अनेक महत्त्वाच्या नोंदी त्यांनी लिहिल्या आहेत.

**<><><><><>**

**मुख्यमंत्री माझी लाडकी** बहीण योजना बंद पडावी म्हणून विरोधकांनी अनेक प्रयत्न केले, मात्र ही योजना कधीही बंद होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि विविध योजनांचा लोकार्पण सोहळा झाला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. राज्यातल्या सर्व महिलांना लखपती करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**राज्य सरकारनं** शेतकऱ्यांचं पुढच्या पाच वर्षांचं वीजबिल माफ केलं असं उपमुख्यमंत्री  देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. तसंच केवळ दहा टक्के भरून शेतकऱ्यांना सौर पम्प दिले जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**रक्षाबंधनाच्या ओवाळणीनंतर** आता राज्यातल्या महिलांना भाऊबीजेची ओवाळणी मिळणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं.

या कार्यक्रमाला महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी मंत्री भागवत कराड, मंत्री अब्दुल सत्तार, मंत्री अतुल सावे उपस्थित होते.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले इथं जनसन्मान यात्रा झाली. समाजातला कोणताही घटक विकासापासून

वंचित राहणार नाही याची विशेष काळजी महायुती सरकारनं घेतली आहे, असं अजित पवार म्हणाले.

यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थी महिलांशी संवाद साधला.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात खामगांव विधानसभा मतदारसंघातल्या २ हजार ३६५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. या योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के अनुदानावर ड्रीपद्वारे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी उपलब्ध होईल, त्यामुळे या भागावरचा कोरडवाहूचा शिक्का पूर्णपणे पुसला जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

इंदिरा गांधी फेलोशिप अंतर्गत राज्यात आजपासून शक्ती अभियानाला सुरुवात झाली असून महिला सशक्तीकरण हे याचं उद्दिष्ट असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. मुंबईत टिळक भवन इथं या अभियानाला सुरुवात केल्यानंतर पटोले वार्ताहरांशी बोलत होते. हे अभियान जिल्हा, तालुकास्तरावर राबवलं जाणार असून महिला नेतृत्व पुढं आणणं हा याचा हेतू आहे, असं ते म्हणाले.

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार बदलण्याचा जनतेचा विचार आहे, असंही पटोले म्हणाले.

<><><><><>

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून ८०० लाभार्थी भाविकांची विशेष रेल्वे आज सकाळी अयोध्येकडे राममंदिर दर्शनासाठी रवाना झाली. रेल्वेस्थानकावर पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. यापुढं चारधाम, बौद्धगया, अजमेर अशा विविध

धार्मिक स्थळांच्या भेटीला ६० वर्षांवरील नागरिकांना या योजनेतून संधी मिळणार आहे. ही योजना सर्वधर्मीयांसाठी असल्याचं यावेळी पालकमंत्री सत्तार म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईत चेंबूर इथं सिद्धार्थ कॉलनी परिसरात आज पहाटे एका दुमजली इमारतीला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीररीत्या होरपळले आहेत. इमारतीच्या तळमजल्यावर विजेच्या तारांजवळ शॉर्टसर्किट झाल्यानं ही आग लागल्याचं अग्निशमन दल अधिकाऱ्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली आणि प्रशासकीय अधिकाऱ्याकडून घटनेची माहिती घेतली. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपये अर्थसहाय्य दिलं जाईल, तसंच जखमींच्या उपचाराचा खर्च शासन करेल, असं त्यांनी जाहीर केलं. या घटनेची उच्च स्तरीय चौकशी केली जाणार असून पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी काळजी घेतली जाईल, असे ते म्हणाले. यावेळी पालकमंत्री मंगलप्रभात लोढा त्यांच्यासोबत होते.

**<><><><><>**

मराठी चित्रपटसृष्टीतली पहिली बाल अभिनेत्री आणि पहिली बालगायिका वासंती घोरपडे-पटेल यांचं आज हैदराबाद इथं वार्धक्यानं निधन झालं. त्या १०१ वर्षांच्या होत्या.

१९३५ मधे प्रभात कंपनीच्या ‘धर्मात्मा’ चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर ‘कुंकू’ चित्रपटात नायिका शांता आपटे यांच्या सोबत ‘भारती सृष्टीत सौंदर्य खेळे’ तसंच ‘अहा भारत विराजे’ ही त्यांनी गायलेली आणि त्यांच्यावर चित्रित झालेली गाणी रसिकांची दाद मिळवून गेली. **‘अमरज्योती’,** ‘संत

तुलसीदास', 'अछूत', 'दिवाली', 'मुसाफिर', 'बेटी', 'दुःखसुख', 'आपकी मर्जी', 'भक्तराज', 'भाग्यलक्ष्मी' अशा मराठी आणि हिंदी चित्रपटांमधून त्यांनी काम केलं.

'शारदा' या संगीत नाटकातही त्यांनी काम केलं होतं. खाँसाहेब धम्मनखाँ आणि पंडित वामनराव सडोलीकर यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं होतं. त्यांच्या सुमारे २०० गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध झाल्या होत्या.

वामनराव सडोलीकर प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता.

**<><><><><>**

दुबई इथं  सुरू असलेल्या महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारतानं पाकिस्तानवर ६ गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १०५ धावा केल्या. भारतानं ४ गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली. स्मृती मंधना आज लवकर बाद झाली. पण शेफाली वर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी डाव सावरला. शेफालीनं ३२, तर जेमिमानं २३ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रितनं २९ धावांंचं योगदान दिलं, मात्र ती जायबंदी झाल्यामुळे तंबूत परतली, भारतानं ही धावसंख्या ४ गड्यांच्या मोबदल्यात सामन्यातले सात चेंडू बाकी असतानाच पार करत १०८ धावा केल्या.

**<><><><><>**

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा, आणि मध्य प्रदेश, या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहतील.

या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील. तसंच उप राष्ट्रीय सुरक्षा

सल्लागार आणि केंद्र, राज्ये आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे (CAPF) वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चेत सहभागी होतील.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यातले संत सेवालाल महाराजांचे चौथे वंशज नामदेव हंजारी महाराज यांचं काल पोहरादेवी इथं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. नामदेव हंजारी महाराजांच्या निधनामुळे बंजारा समाजावर शोककळा पसरली आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यात कारुंडे गावानजिक एका पुलावर आज दुपारी १ ते दीडच्या सुमाराला एक गाडी टेम्पोला धडकल्यानं झालेल्या अपघातात चार जण जागीच ठार झाले, तर इतर तीनजण जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

येत्या २ दिवसांत राज्यात सर्वत्र तुरळक जागांवर पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वेधशाळेने वर्तवली आहे.